दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक २२०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.०३ सप्टेंबर २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## ट्रान्सजेंडर समावेशक लैंगिक शिक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्र सरकारला नोटीस

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- शालेय अभ्यासक्रमात ट्रान्सजेंडर समावेशक सर्वांगीण लैंगिक शिक्षण (सीएसई) समाविष्ट करण्याबाबत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकार, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) तसेच महाराष्ट्रासह सहा राज्यांकडून प्रत्युत्तर मागितले.

सरन्यायाधीश भूषण गवई व न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांचे वकील वरिष्ठ अधिवक्ता गोपाल शंकरनारायण यांच्या युक्तिवादाची नोंद घेत आठ आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले. याचिका काव्या मुखर्जी साहा या बारावीतील विद्यार्थिनीने दाखल केली आहे. या याचिकेत एनसीईआरटी आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदांनी (एससीईआरटी) तयार केलेल्या शालेय अभ्यासक्रमात व पाठ्यपुस्तकांत ट्रान्सजेंडर समावेशक सीएसई समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र सरकारची शिष्टाई फळाला; मनोज जरांगेंनी उपोषण सोडले

## हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याच्या जीआरसह अन्य काही मागण्या मान्य



मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानावरील उपोषण संपल्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने त्यांच्या जवळपास सर्वच मागण्या मान्य केल्या आहेत. त्यासंबंधीचे जीआरही सरकारने काढले आहे. त्यामुळे जरांगेंनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून लिंबू सरबत घेऊन आपले उपोषण सोडले. यामुळे गत शुक्रवारपासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा तिढा यशस्वीपणे सुटला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुकारलेले आमरण उपोषण अखेर पाचव्या दिवशी संपुष्टात आले आहे. सरकारने त्यांच्या आठ मागण्यांपैकी सहा मागण्या मान्य केल्या असून, यामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आले. यानंतर मराठा समाजबांधवांनी मुंबईतील सीएसएमटी रेल्वे स्थानकाबाहेर फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला.

राज्य सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी सरकारचे आभार मानले आहेत. तसेच उपोषण सोडल्यानंतर मनोज जरांगे यांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. उपोषण सोडल्यानंतर पहिली प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे यांनी म्हटलं की, माझ्या समाजाचं कल्याण झालं असं सांगत सर्व आंदोलकांनी आता मुंबईतून पुन्हा आपआपल्या गावी जाताना शांततेत जावं असं आवाहनही त्यांनी मराठा आंदोलकांना केलं आहे.

'महाराष्ट्रात मराठ्यांचा विजय झाला आहे. आज मराठा समाजासाठी सोन्याचा दिवस (पान ४ वर)

## मंत्रिमंडळ उपसमितीने समाजहिताचा तोडगा काढला-मुख्यमंत्री

मनोज जरांगे पाटील यांच्या जवळपास सर्व मागण्या राज्य सरकारने मान्य केल्यानंतर त्यांनी आपलं उपोषण सोडलं. जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया देतांना म्हटले की, 'मला अतिशय आनंद आहे की मराठा समाजाच्या हिताचा तोडगा आज मंत्रिमंडळ उपसमितीने काढला. त्यामुळे जे उपोषण सुरू आहे, ते उपोषण आता संपलं आहे. खरं म्हणजे हैदराबाद गॅझेट लागू करण्याबाबत आमची सुरूवातीपासून तयारी होती. मात्र, मनोज जरांगे पाटील यांची सरसकटची मागणी होती, त्यामध्ये कायदेशीर अडचणी होत्या. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय पाहता सरसकटची मागणी पूर्ण करणं शक्य नव्हतं', असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. 'आपण वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. मंत्रिमंडळ उपसमितीच्याही ही गोष्ट लक्षात आणून दिली. आपल्या कायद्याप्रमाणे आरक्षण हे समुहाला नसतं तर आरक्षण हे व्यक्तीला असतं. तसेच त्या व्यक्तीने ते क्लेम करायचं असतं. त्यामुळे ते सरसकटची मागणी मान्य करता येणार नाही. त्यांनी देखील ती भूमिका समजून घेतली आणि त्यांनीही म्हटलं की सरसकट कायद्यात बसत नसेल तर सरसकट करू नका. त्यानंतर मग मंत्रिमंडळ उपसमितीने आज दिलेल्या निणऱ्यानुसार तोडगा काढला आणि त्यांच्या काही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत', असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## सरकारने सकारात्मक भूमिका घेतली-उपमुख्यमंत्री शिंदे

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे पाटील यांनी पाच दिवस उपोषण केले. सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. आम्ही सुरुवातीपासून सकारात्मक होतो. कायदा टिकला पाहिजे याबाबत आम्ही विचार केल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मराठा समाजावर अन्याय होऊ नये, मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे अशी आमची भूमीका असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी केली होती. त्या कमिटीतीली सगळ्यांचे अभिनंदन करतो असे शिंदे म्हणाले. सर्वंकष चर्चा करुन मोठा निणऱ्य घेतला आहे. सातारा गॅझेट आणि हैदराबाद गॅझेटबाबत मागण्या होत्या त्या पूर्ण केल्या असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. पूर्ण प्रमाणपत्र मिळणे अधिक सुलभ होणे अशी मागणी होती. तीन सदस्यांची समिती गठीत केली असून तत्काळ कार्यवाही करण्यात येणार असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

सातारा गॅझेटसाठी थोडा अवधी लागणार आहे, ते त्यांना सांगितले आहे. मराठवाडा म्हणजेच हैदराबाद गॅझेटबाबत तात्काळ निणऱ्य घेण्यात आले आहेत. मोठ्या प्रमाणवर आणखी मागणी होती. यामध्ये आंदोलना दरम्यान ज्यांचा मृत्यू झाला त्यांना १० लाख आणि नोकरी देण्याबाबत मी मुख्यमंत्री असताना निणऱ्य घेतला होता. त्याचा अनेकांना लाभ दिला आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात पुढील कार्यवाही होईल असेही ते म्हणाले.

## मराठा समाजाच्या अपेक्षांना न्याय दिला-उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे यांच्या भावना आणि मराठा समाजाच्या अपेक्षांना न्याय देण्याचा प्रयत्न शासनाने केला असल्याचं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

'मराठा समाजाच्या आरक्षणासह इतर मागण्यांबाबत महाराष्ट्र शासनाने पहिल्या दिवसापासून सकारात्मक व संवेदनशील भूमिका घेतली होती. आंदोलनकर्त्यांच्या भावनांचा सन्मान राखत आणि त्यांना न्याय मिळावा यासाठी शासनाने सतत प्रयत्न केले. त्या अनुषंगाने मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशींवर तातडीने निर्णय घेऊन आज शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी स्वतः, आम्ही तिघांनी मिळून याबाबत सविस्तर चर्चा करून योग्य निर्णय होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले', (पान ४ वर)

## जरांगेचें आंदोलन मागे,पण ओबीसी संतप्त; उपोषण सुरूच ठेवणार

नागपूर दि.२ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी मागील पाच दिवसांपासून उपोषणावर बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आठ पैकी सहा मागण्या राज्य शासनाने मान्य केल्याने जरांगे यांनी मंगळवारी सायंकाळी उपोषण मागे घेतले. त्यानंतर मुंबईत मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करणे सुरू केले. दरम्यान ओबीसींमधून मराठ्यांना आरक्षण देऊ नये, म्हणून नागपुरात उपोषणावर बसलेल्या ओबीसींनी मात्र यावर संतप्त प्रतिक्रिया दिली असून आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

मराठा आरक्षणासाठी मुंबईत जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केल्यावर राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्यावे ही जरांगे यांची प्रमुख मागणी होती, त्यासाठी लाखो मराठा समाज बांधव मुंबईत दाखल झाले होते. त्यामुळे मुंबई ठप्प झाली होती व सरकारवर दबावही वाढत चालला होता. सरकारने या दबावाला बळी पडू नये म्हणून राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे प्रमुख डॉ. बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वाखाली नागपुरातील संविधान चौकात ओबीसींनी साखळी उपोषण सुरू केले होते.

भाजपसह विविध राजकीय पक्षाच्या ओबीसी नेत्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. 'ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण देण्यात येणार नाही' असेसरकारने आम्हाला लेखी द्यावे,अशी मागणी ओबीसी संघटनांची आहे. दरम्यान मंगळवारी सरकारचे प्रतिनिधी व जरांगे यांची चर्चा होऊन जरांगेच्या आठपैकी सहा मागण्या मान्य केल्या आहेत. त्याच्या तीव्र प्रतिक्रिया ओबीसी संघटनांमध्ये उमटल्या असून सरकार जरांगेंच्यापुढे झुकले का ? असा सवाल केला जात आहे. त्यामुळे ओबीसी संघटनांनी त्यांचे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देणार नाही,असे आश्वासन जोपर्यंत सरकार देणार नाही, तोपर्यंत आम्ही आंदोलन मागे घेणार नाही,असा इशारा (पान ४ वर)

## मुंबईतील आंदोलनावरुन मनोज जरांगे आणि सरकारला न्यायालयाने फटकारले

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यकारी मुख्य न्यायधीश चंद्रशेखर व आरती साठे यांच्या बेंचसमोर मुंबईतील आझाद मैदानात चालू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाबाबतची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने मराठा आंदोलकांचे नेते मनोज जरांगे पाटील आणि राज्य सरकार दोघांनाही खडे बोल सुनावले. केवळ २४ तास आझाद मैदानात उपोषणाला बसण्याची परवानगी दिलेली असताना तुम्ही कोणत्या अधिकाराने गेल्या चार दिवसांपासून तिथे बसला आहात? असा प्रश्न उच्च न्यायालयाने जरांगेंच्या वकिलांसमोर उपस्थित केला.

दुसऱ्या बाजूला, 'तुम्ही अजूनही आझाद मैदान व आसपासचा परिसर रिक्त का करू शकला नाहीत? आंदोलकांना तिथून हटवण्यासाठी तुम्हाला जरांगे यांचीच मदत का घ्यावी लागतेय?' असे प्रश्न उपस्थित करत उच्च न्यायालयाने राज्य सरकारलाही (पान ४ वर)

## अतिवृष्टीचे संकट; शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर दि.२ (प्रतिनिधी)- सोलापूर जिल्ह्यातून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. यात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने एका वृद्ध शेतकऱ्याने टोकाचं पाऊल उचलत आत्महत्या केलीय. दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती येथील ही धक्कादायक घटना आहे. चंद्रकांत माळगे असे आत्महत्या केलेल्या ७५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचे नाव आहे. गेल्या काही दिवसांत सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांची मोठी हानी झाली. परिणामी आर्थिक नुकसान आणि त्यातून आलेल्या नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असे बोललं जात आहे. मात्र या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती, तांदूळवाडी, पिंजरवाडी, संगदरी या परिसरात देखील यंदा अतिवृष्टी झाली. सततच्या पावसाने खरीप हंगामातील पिके नष्ट झाली. हाती काहीच लागणार नाही या विवंचनेत शेतकरी चंद्रकांत माळगे होते.

त्यातच शेतीसाठी घेतलेले कर्ज कसे फेडायचे असा विचार त्यांना सारखा सतावत होता. त्यातूनच त्यांनी गळफास घेत आत्महत्या केल्याची माहिती माळगे यांच्या नातेवाईकांनी दिली. दरम्यान या प्रकरणी सिव्हिल पोलीस चौकीत नोंद करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करतायत.

## मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याच्या प्रक्रियेला सुरुवात

बीड दि.२ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यात मराठा आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याच्या प्रक्रियेला वेग आलाय. ज्या आंदोलनामध्ये पाच लाख रुपयांपेक्षा कमी नुकसान झाले आहे. त्या गुन्ह्यांची प्रकरणे मागे घेतली जाणार आहेत. बीड जिल्ह्यात या गुन्ह्यांबाबत आठ दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश अप्पर जिल्हा दंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सर्व उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना दिले आहेत.

गृह विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यात मराठा आरक्षणासंदर्भात दाखल झालेली सुमारे ४०० प्रकरण अद्याप तपासायची बाकी आहे. ही सर्व प्रकरणे पुढील २० दिवसात तपासून तातडीने अहवाल सादर करण्याचा निणऱ्य घेण्यात आला. या निणऱ्याची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी अप्पर जिल्हा दंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी हे निर्देश दिले आहेत. सर्व प्रलंबित प्रकरणांची तपासणी आठ दिवसात पूर्ण करून जिल्हाधिकारी कार्यालयाला अहवाल सादर करण्याचे निर्देश याबाबत आहेत. या निणऱ्यामुळे मराठा आंदोलकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## मराठा समाज सामाजिकदृष्ट्या मागास नाही; मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्या, छगन भुजबळ यांची मागणी

नाशिक दि.२ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सोमवारी पत्रकार परिषद घेत त्यांनी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण नको, अशी मागणी केली आहे. तसेच आज पुन्हा एकदा त्यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नसल्याचे म्हटले आहे.

छगन भुजबळ म्हणाले, सगळ्या आयोगांनी मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नाही. हा समाज जो आहे हा आर्थिकदृश्य मागास असेल, शैक्षणिकदृष्ट्या असेल, परंतु हा समाज सामाजिक मागासलेला नाही असे सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने सांगितले आहे.

महाराष्ट्रात अनेक मुख्यमंत्री झाले आहेत ज्यांनी मराठा समाजाला मागास मानेल नाही. सारथीच्या माध्यमातून जे ओबीसीला मिळते ते तर दिलेच, त्यापेक्षा अधिक देणे सुरू आहे. वसतीगृहसाठी फुकट दिले आहे. परंतु, ओबीसीला अजूनही लढावे लागत आहे. त्यांना वर्षाला ६० हजार रुपये दिले जातात. आम्हाला अजूनही मागावे लागत आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून (पान ४ वर)

## देशात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण करण्यात येवू नये; या आशयाची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- देशात पेट्रोल मध्ये इथेनॉल मिश्रण करण्यात येवू नये तसेच इथेनॉल शिवाय पर्यायी इंधन वापरण्याची मुभा द्यावी यासाठी सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई व न्यायमुर्ती के विनोद चंद्रन या खंडपीठाने सुनावणी केली. यांसदर्भातील याचिका न्यायालयानं फेटाळली आहे. त्यामुळं देशातील ५ कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याची प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी दिली.

देशातील क्रुड ऑईलचा व्यापार करणारे व्यापारी, काही (पान ४ वर)

## ...तर सर्व मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण मिळणार


### सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ सिद्धार्थ शिंदे यांची माहिती

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- गेल्या पाच दिवसांपासून सुरु असलेले मराठा आरक्षणाचे आंदोलन यशस्वी झाले आहे. मराठा समाजाला मराठवाडासह पश्चिम महाराष्ट्रातही आरक्षण मिळणार आहे. याचा जीआर काढण्यात आला आहे. असे असले तरी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळणार का, असा सवाल लोकांमध्ये उपस्थित होत होता. राज्य सरकारने जीआर काढला तरी ओबीसी नेते शांत आहेत, यावरून उलटसुलट चर्चा सुरु असताना सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ सिद्धार्थ शिंदे यांनी मराठ्यांना आरक्षण ओबीसीमधूनच मिळणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

मराठा आंदोलनाला ओबीसी समाजाचे नेते हायकोर्टात आव्हान देऊ शकणार आहेत. यासाठी काही काळ जाईल. मराठा समाजाला या जीआरनुसार प्रमाणपत्र मिळण्यास व त्याची पडताळणी होण्यासाठी जवळपास दोन महिने लागतील, असेही ते म्हणाले. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळणार आहे. हैदराबाद गॅझेट लागू केल्याने मराठवाड्यातील मराठा समाजाचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच सातारा गॅझेटीयर आले की पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांना देखील कुणबी प्रमाणपत्र मिळणार आहे. यामुळे त्रिसदस्यीय समितीकडून प्रमाणपत्र मिळाले की हे मराठे ओबीसीमध्येच येणार असल्याचे शिंदे म्हणाले.

कुणबी, (पान ४ वर)

## अफगाणिस्तान भूकंपातील मृतांची संख्या १४०० पार



काबुल दि.२ (वृत्तसंस्था)- अफगाणिस्तानातील भूकंपात मृतांचा आकडा १४११ वर पोहोचला आहे, तर जखमींची संख्या ३२५० पेक्षा जास्त झाली आहे. वृत्तसंस्था एपीनुसार, तालिबानने ही माहिती दिली आहे. (पान ४ वर)

# सामाजिक एकाकीपणा आणि आधुनिक समाज

आजच्या धावपळीच्या युगात, जेव्हा आपण इंटरनेटच्या माध्यमातून जगाशी जोडलेलो आहोत, त्याच वेळी अनेक लोक मानसिक, भावनिक आणि सामाजिक पातळीवर एकटे पडत आहेत. सामाजिक एकाकीपणा ही आता एक गंभीर सामाजिक समस्या झाली आहे, जी केवळ वृद्धांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर तरुण, प्रौढ आणि अगदी लहान मुलांनाही ती आपल्या कवेत घेते आहे.

एकाकीपणा म्हणजे केवळ एखाद्या व्यक्तीच्या आजूबाजूला कोणी नसणे नव्हे, तर मनातल्या मनात आपण एकटे असल्याची भावना निर्माण होते. काही वेळा माणूस गर्दीत असूनही एकाकी असतो, तर कधी माणूस एकटाच असूनही समाधानी असतो.

'माणूस हा समाजशील प्राणी आहे' असं जरी आपण मानत आलो असलो, तरी आजचा माणूस अधिकाधिक एकटा पडत चालला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे नोकरीच्या निमित्ताने माणसं गावापासून, कुटुंबापासून दूर जातात. कामाच्या वेळा लांबतात, थकवा वाढतो आणि उरतो तो एकाकी वेळ. वृद्धांना त्यांच्या व्यस्त मुलांकडून वेळ मिळत नाही व तरुण पिढीला मैत्रीच्या खऱ्या नात्यांची भूक लागलेली असते.

कुंदाताईचे वय आता ऐंशीला झुकलेले आहे. पूर्वी त्यांच्या नवऱ्याचा पगार जेमतेमच होता, म्हणून कुंदाताईंनी नोकरी धरली. दिवस, महिने, वर्ष भराभर पळत होती. मुलगी लग्न होऊन सासरी गेली. मुलाने परगावी आपला संसार थाटला. काळाच्या ओघात कुंदाताईच्या पतीचे निधन झाले. कुंदाताई एकट्या पडल्या. त्यांचे वय वाढत होते. कुणाच्या आधाराशिवाय त्यांना जगणे कठीण वाटत होते. शेवटी कुंदाताईच्या मुलीने त्यांना आपल्याकडे आणले. आता त्यांचा वेळ चांगला जाऊ लागला. मुख्य म्हणजे पूर्वी असलेली असुरक्षिततेची भावना जाऊन मनाला सुरक्षितता वाटू लागली.

सामाजिक एकाकीपणा म्हणजे एखाद्या व्यक्तीचे इतर लोकांशी पुरेसे संबंध न ठेवणे किंवा सामाजिक सहभाग कमी होणे. यामध्ये केवळ शारीरिकदृष्ट्या एकटे राहणे एवढेच नव्हे, तर मानसिकदृष्ट्या कुणाशीही जोडलेले नसणे, आपल्याला कोणी समजून घेत नाही किंवा आपली कोणी साथ देत नाही, अशी भावना असणेही आले.

पूर्वीच्या काळी लोक एकत्र कुटुंबात राहात असत. एकत्र आलेले जीवन माणसाला आधार देत असे. आता मात्र 'न्यूक्लिअर फॅमिलीची', एकमेकांना वेळ देण्याची क्षमता कमी झाली आहे. शहरातील जीवन स्पर्धा, यश, वेग या चक्रात फिरत आहे. अशा चक्रात मनुष्य संवाद, सहवास, सहवेदना गमावून बसतो. संवादाची जागा आता 'चॅट', 'इमोजी' यांनी घेतली आहे. ही साधने माहिती पोहोचवतात, पण भावना पोहोचवू शकत नाहीत.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपण एकमेकांशी सतत संपर्कात असतो; परंतु प्रत्यक्ष संवाद आणि संबंध कमी झाले आहेत. सोशल मीडियावर हजारो 'फ्रेंड्स' असले तरी, खरी मैत्री किंवा भावनिक जिव्हाळा हरवलेला दिसतो.

आई-वडील दोघेही नोकरी करत असल्यामुळे, लहान मुलांना किंवा वृद्धांना घरी एकटे राहावे लागते. हे सर्व घटक सामाजिक एकाकीपणाला खतपाणी घालतात. सामाजिक एकाकीपणा ही एक मानसिक आरोग्याची समस्या बनत चालली आहे. एकटे राहणाऱ्या व्यक्तींमध्ये नैराश्य, चिंता, असुरक्षितता, आत्मविश्वासाचा अभाव अशा समस्या अधिक प्रमाणात आढळतात. दीर्घकाळ एकाकी राहिल्यास, व्यक्तीच्या विचारसरणीवर, निर्णयक्षमता व सर्जनशीलतेवर विपरित परिणाम होतो. शारीरिकदृष्ट्याही एकाकीपणाचे परिणाम दिसतात-उदा. हृदयविकार, उच्च रक्तदाब, निद्रानाश, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे इ. आज आपण ज्या सोयीसुविधांनीयुक्त जीवन जगतो, त्यात 'स्वातंत्र्य' आणि 'गोपनीयता' यांचा आग्रह आहे. लोक एकमेकांच्या आयुष्यात ढवळाढवळ नकोसे समजतात. पण याच बरोबरीने, भावनिक आधार, संवाद आणि आपुलकीची कमतरता भासत आहे. अनेकदा डिजिटल जगात आपण कनेक्टेड असतो, पण खरं कनेक्शन हरवून बसतो. समाधान, सोबती व जिव्हाळा हे कोणत्याही आधुनिक साधनांपेक्षा अधिक मौल्यवान आहेत.

मोबाइल फोन, इंटरनेट, सोशल मीडिया ही संवादाची साधने असली तरी, त्यांनी खरी मैत्री आणि सहवासाची जागा घेतलेली नाही. संवादात सौहार्द आणि आत्मीयता हरवते आहे.

पूर्वी एकाकीपणा वृद्धांमध्ये अधिक दिसून येत असे, पण सध्या कॉलेजमध्ये शिकणारे विद्यार्थी, नवतरुण व नवविवाहित जोडपी देखील या समस्येने ग्रासलेली दिसतात. करिअरच्या स्पर्धा, रिलेशनशिपमधील तणाव, सोशल मीडियावरच्या दिखाव्यामुळे निर्माण होणाऱ्या न्यूनगंडामुळे तरुण मन अधिक अस्थिर होत आहे.

कुटुंब, मित्र, शेजारी, सहकारी यांच्याशी नियमित संवाद साधावा. छोटे गट, सामाजिक संस्था, सांस्कृतिक कार्यक्रम यात सहभाग घ्यावा. आपली सुखं दुःखं एकमेकांना सांगावीत. यातून मानसिक आरोग्य चांगले राहते. काही काळ सोशल मीडियापासून दूर राहून प्रत्यक्ष भेटी आणि संभाषणावर भर द्यावा. घरामध्ये 'क्वालिटी टाइम' द्यावा. जेवण एकत्र घेणे, घरातील वृद्धांशी गप्पा मारणे, मुलांसोबत खेळणे या छोट्या गोष्टीही मोठा फरक घडवू शकतात. जर एकाकीपणामुळे नैराश्य किंवा चिंता निर्माण होत असेल, तर तज्ज्ञ सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. सायकोथेरपी, काउन्सेलिंग या सेवा खूप उपयोगी ठरतात. त्यामुळे शाळा, महाविद्यालये, कार्यस्थळे, नगरपालिका आणि समाजसेवी संस्था यांनी एकत्र येऊन सहकार्य करणे गरजेचे आहे. भौतिक सुखसुविधा, गगनचुंबी इमारती, स्मार्टफोन आणि आभासी जगाच्या गर्दीत माणूस माणसाला हरवत चालला आहे.

'माणूस माणसाच्या सुख-दुःखात सहभागी होतो, तेव्हाच समाज खऱ्या अर्थाने समृद्ध होतो' हे सत्य विसरून चालणार नाही. म्हणूनच, आधुनिकतेच्या प्रवाहात आपले सामाजिक नाते व भावनिक संबंध जपले पाहिजेत. आपण सगळेच कधीतरी एकटे पडतो, पण त्यातूनच आपल्याला नवे अर्थ, नवे नाते, नवी ऊर्जा मिळू शकते. फक्त थोडी मदत हवी व मन मोकळं करायला कोणी हवं असतं.

# मराठा समाजाला आरक्षणापासून,तर कलार- कलाल समाजाला आर्थिक विकास महामंडळापासून वंचित ठेवण्याचा सरकारचा कुटील डाव!

**आंदोलनाच्या** विरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने १ सप्टेंबर तातडीने सुनावणी घेतली.या सुनावणीत जरांगे पाटलाच्या आंदोलनावरून फडणवीस सरकारला सुनावले.यावरून स्पष्ट लक्षात येते की सरकार अनेक चुकीचे निर्णय घेत आहेत व समाजा-समाजामध्ये फुट पाडण्याचे काम करीत आहेत. सरकारच्या नितीमध्ये आणि नियतिमध्ये फरक असल्याचे स्पष्ट दिसून येते.मराठा समाजाची मुख्य भूमिका काय त्यांना खरोखरच सध्याच्या परिस्थितीत आरक्षणाची गरज आहे का?यावर गांभीर्याने विचार न करता राजकीय खेळी होत असल्याचे दिसून येते यात विरोधी पक्ष सुध्दा सहभागी आहेत.गेल्या दोन वर्षांपासुन जरांगे पाटील आंदोलन करीत आहे. परंतु सरकार त्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करून राजकारण करीत.याचे अनेक जिवंत उदाहरण आहेत.ज्या संघटना आंदोलन करतात त्यांना सरकार भोपळा दाखविते आणि जे आंदोलन करीत नाही अशा संघटनांना किंवा समाजाला सरकार सरळ हातांनी महामंडळ किंवा आरक्षण देते.याचा अनुभव कलार-कलाल समाजाला चांगल्याप्रकारे आला आहे.कारण गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना समाजाला आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी आंदोलन आणि संघर्ष करीत आहे सोबतच कलाल-कलार समाजाच्या संपूर्ण संघटना आर्थिक विकास महामंडळाची मागणी करीत आहेत. परंतु सरकार आश्वासनाची तारीख पे तारीख अशाप्रकारचा लपंडाव खेळतांना स्पष्ट दिसते. गेल्या चार वर्षांपासून कलार- कलाल समाज भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळाची मागणी करीत आहे.त्याकडे सरकार व आमदार हेतुपुरस्सररीत्या दुर्लक्ष करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की कलार-कलाल समाजाला आर्थिक विकास महामंडळ केव्हा देणार? आणि समाजाचा विकास केव्हा होणार? व सरकारने दिलेल्या आश्वासनाचे काय? सरकार कलाल-कलार समाजाला आर्थिक विकास महामंडळा पासून का डावलत आहे?असे अनेक प्रश्न समाजापुढे व संघटनेपुढे उपस्थित होत आहे.

कलार-कलाल समाज विकासाच्या प्रवाहात यावा या उद्देशाने गेल्या चार वर्षांपासून आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी करीत आहे. परंतु सरकार याकडे नेहमीप्रमाणे आताही दुर्लक्ष करतांना दिसते ही अत्यंत दुःखद बाब आहे.

आपणाला कल्पना असेल की बऱ्याचशा समाजाच्या आमदारांनी आपापल्या समाजाच्या विकासाच्या प्रती तत्परता दाखवुन सरकारकडून आर्थिक विकास महामंडळ खेचून आणले याचे स्वागतच.परंतु आता शंका निर्माण होत आहे की या सरकारमध्ये कलार-कलाल समाजाला न्याय देणारा आमदार किंवा मंत्री नाही का? असे अनेक प्रश्न समाजबांधवांपुढे उपस्थित होत आहे.परंतु कलार-कलाल समाजातील मागास समाजबांधवांसाठी सरकारने ताबडतोब आर्थिक विकास स्थापन करण्याची घोषणा करावी जेणेकरून समाजातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजबांधवांना त्याचा लाभ घेता येईल.परंतु सरकार कलाल-कलार समाजाकडे हेतुपुरस्सर रित्या दुर्लक्ष करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे सरकारची भेदभाववाली निती पहाता जरांगे पाटलांसारखी भुमिका कलार-कलाल समाज किंवा अन्य समाज घेवू शकतो.

सरकार आता स्वार्थी झाल्याची दिसून येते.कारण जो समाज काहीच मागणी करीत नाही किंवा कोणताही संघर्ष करीत नाही त्यांना सरळ हातांनी महामंडळ व अन्य सुविधा देण्यासाठी तत्परता दाखवित आहे.परंतु जरांगे पाटील आरक्षणाची मागणी अनेक दिवसांपासून करीत आहे त्याकडे सरकार दुर्लक्ष करून तारीख पे तारीख अशी भुमिका घेतांना दिसते.

अशाच पध्दतीने सरकार कलाल-कलार समाजाकडे सुध्दा दुर्लक्ष करून तोंडाला पाने पुसण्याचे काम करीत आहे.कलार -कलाल समाजाला आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी संघटनेच्या मार्फत गेल्या चार वर्षांपासून लेखी निवेदन,मेल व्दारे निवेदन,आंदोलन,संघर्ष सुरू आहे. परंतु सरकार आश्वासन देते पण काहीच करीत नाही.सरकारला कल्पना आहे की कलाल-कलार समाज शांत आहे. परंतु सरकारच्या दिरंगाईमुळे शांततेचा पहाड दिवसेंदिवस ढासळत आहे. त्यामुळे सरकारच्या मार्फत असे वाटत आहे की महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेने आपल्या मागण्यांसाठी जरांगे पाटलांसारखी भुमिका आवश्यक आहे का?व त्याची समाजाने तयारी करावी काय? अशा आक्रमक भावना व प्रतीक्रीया समाजबांधवांकडुन येत आहे. त्यामुळे मराठा समाजाचा आरक्षणाचा मुद्दा असो अथवा कलाल-कलार समाजाचा आर्थिक विकास महामंडळाचा मुद्दा असो त्याकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन हाताळला पाहिजे तेंव्हाच सरकार लोकशाहीचे काम करीत आहे असे म्हणता येईल.अन्यथा सरकार मनमानी करीत आहे असे होईल.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**

# व्यवसायातून उन्नती साधूया.. जीवनाचा उत्कर्ष घडवूया

राज्यातील युवक-युवतींमध्ये असलेल्या प्रचंड क्षमतेला दिशा देण्यासाठी व स्वप्नांना वास्तवात आणण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. समाजातील मागास घटक, बेरोजगार युवक-युवती यांना व्यवसायासाठी प्रोत्साहन देऊन विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात येत असून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात येत आहेत.

युवकांच्या हाताला रोजगार दिला तर ते इतरांसाठीही रोजगार निर्माण करतील. याच विचाराने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ कार्यरत आहे. बेरोजगारी कमी करण्यासाठी व उद्योग-व्यवसायात तरुणांना संधी देण्यासाठी या महामंडळामार्फत विविध योजना राबविल्या जातात.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील एक महत्त्वाचे महामंडळ आहे. हे महामंडळ प्रामुख्याने मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तरुणांना आर्थिक सहाय्य पुरवून त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. या महामंडळाची स्थापना २७ नोव्हेंबर १९९८ रोजी मराठा समाजातील बेरोजगारी कमी करण्यासाठी आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत अल्प व्याजदर कर्ज सुविधा, अनुदानावर आधारित आर्थिक योजना, प्रशिक्षण कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन आणि तरुणांसाठी व्यवसाय योजना अशा आर्थिक विकासाच्या योजना राबवल्या जातात. या योजनांचा मुख्य उद्देश मराठा समाजातील तरुणांना व्यवसायासाठी लागणारी भांडवली मदत पुरवून त्यांना स्वावलंबी बनवणे. यामुळे अनेक तरुणांनी स्वतःचे उद्योग सुरू केले आहेत. या महामंडळाच्या मदतीमुळे ग्रामीण भागातसुद्धा उद्योजकतेचा विकास होताना दिसत आहे.

**अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांसाठी राज्य शासनाने अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात ३०० कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. नियोजन विभागाने याबाबतचा शासन निर्णय १५ जुलै २०२५ रोजी निर्गमित केला आहे.

या महामंडळा मार्फत वैयक्तिक कर्ज आणि गट कर्ज व्याज परतावा या योजना राबवल्या जातात.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना(IR-I)

या योजनेअंतर्गत राज्यातील कोणत्याही बँकेमार्फत १५ लाख रुपयाच्या मर्यादित कोणत्याही व्यवसाय / उद्योगाकरीता लाभार्थ्यांनी कर्ज घेतल्यास, त्या कर्जावरील व्याज परतावा जास्तीत-जास्त ७ वर्षाकरीता, १२ टक्केंच्या कर्ज दर मर्यादेत अथवा ४.५ लाख रुपये रक्कमेच्या मर्यादेत देण्यात येतो. २ फेब्रुवारी २०१८ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण निर्माण झालेले पात्रता प्रमाणपत्र (ङजख) १,८९,३१८ तर एकूण बँक कर्ज मंजुरी लाभार्थी संख्या १,५३,७२६ असून बँकांनी वितरित केलेली कर्ज मंजूर रक्कम १३,१६९.९९ कोटी आहे. व्याज परतावा सुरु झालेली लाभार्थी संख्या (Claim) १,७५,८३६ असून व्याज परतावा झालेली रक्कम १,३६१.५८ कोटी रुपये आहे.

गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II)

या योजनेअंतर्गत किमान दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन, दोन व्यक्तींसाठी कमाल २५ लाख रुपयाच्या मर्यादेवर, तीन व्यक्तींसाठी ३५ लाखाच्या मर्यादेवर, चार व्यक्तींसाठी ४५ लाखाच्या मर्यादेवर व पाच व पाच पेक्षा अधिक व्यक्ती असल्यास ५० लाखापर्यंतच्या व्यवसाय / उद्योग कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याज किंवा १५ लाखाच्या मर्यादित कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हफ्ते भरल्यास, हफ्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम गटाच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. या योजनेमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO) गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरीता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल. २ फेब्रुवारी २०१८ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण निर्माण झालेले पात्रता प्रमाणपत्र (LOI) १०१४ असून एकूण बँक कर्ज मंजुरी लाभार्थी गट संख्या ९६९ आहे. एकूण बँकेने वितरित केलेली कर्ज मंजूर रक्कम ३६१.८७ कोटी आहे.

व्याज परतावा सुरु झालेली लाभार्थी संख्या (Claim) ५८९ आहे. व्याज परतावा झालेली रक्कम ३४.०३ कोटी आहे.

गट प्रकल्प कर्ज योजना (GL-I):

FPC (Farmer Producer Com{any) गटांना १० लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज उद्योगासाठी देण्यात येते व ७ वर्षे वसुली करण्यात येते. सद्यस्थितीत गट प्रकल्प कर्ज योजना (GL-I) ही गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. महामंडळामार्फत २९ ऑगस्ट २०२५ पर्यंत लाभार्थ्यांना व लाभार्थी गटांना एकूण १,३९८.९६ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

**महामंडळाच्या योजनांकरिता अटी व शर्ती**

उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. अर्जदाराचे वय १८ ते ६० वर्षांच्या दरम्यान असावे. लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असावे. (जे ८ लाखाच्या मर्यादेत असल्याचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र) किंवा वैयक्तीक I.T.R. (पती व पत्नीचे) लाभार्थ्यांने महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक / कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य असेल.

दिव्यांग व्यक्तीला योजनेअंतर्गत लाभ घ्यावयाचा असल्यास तो मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) अंतर्गत भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एल.एल.पी. कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय / उद्योगाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येईल व या योजनांची अंमलबजावणी तंतोतंत शासन निर्णय क्र. अपाम २०१७/प्र.क्र.१८९/रोस्वरो-१, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ नुसार करण्यात येईल.

**योजनांचा लाभ घेण्यासाठी कार्यपध्दती**

महामंडळाकडून 'Letter of Intent (LOI) काढण्यासाठी खालील कागदपत्रे लागतात. ही कागदपत्रे ऑनलाइन अर्ज करताना अपलोड करावी लागतात.

पात्रता प्रमाणपत्र (ङजख) करीता महत्वाची कागदपत्रे :

१. आधार कार्ड (अपडेटेड मोबाइल क्रमांक व स्वतःचा ई-मेल आयडीसह)

२. रहिवासी पुरावा (रहिवासी दाखला / लाईट बिल / रेशनकार्ड / गॅस बिल / बँक बुक)

३. उत्पन्नाचा पुरावा

(उत्पन्नाचा दाखला / आयकर रिटर्न जर लग्न झाले असल्यास, नवरा-बायकोचे व लग्न न झालेल्या सदस्यांचे स्वतःचे आयकर रिटर्न आवश्यक)

४. जातीचा पुरावा, शाळा सोडल्याचा दाखला/ऋशपशीरश्र ठशसळीींशी उतारा नंबर १ किंवा जातीचा दाखला.

५. लग्न झालेल्या महिलांसाठी Pan Card / Marriage Certificate / गॅझेट आवश्यक.

६. एक पानी प्रकल्प अहवाल (वेब प्रणलीवर उपलब्ध आहे)

७. स्वतः घोषणापत्र (वेब प्रणलीवर उपलब्ध आहे)

(जर आधार कार्ड व शाळा सोडल्याचा दाखला यामधील जन्म तारखे मध्ये तफावत असल्यास) ही कागदपत्रे अपलोड करताना त्यांची स्कॅन केलेली प्रत स्पष्ट आणि वाचण्यायोग्य असावी. अर्ज करताना तुम्हाला https://udyog.mahaswayam.gov.in या वेबसाइटवर नोंदणी करून अर्ज भरावा लागतो. यानंतर तुम्हाला 'ङजख' मिळते, जे बँकेत कर्ज मंजुरीसाठी सादर करावे लागते.

तुम्ही कोणत्या योजनेसाठी अर्ज करत आहात (वैयक्तिक किंवा गट) त्यानुसार काही कागदपत्रे बदलू शकतात. अधिकृत आणि अचूक माहितीसाठी, महामंडळाच्या वेबसाइटला भेट देणे किंवा जवळच्या जिल्हा कार्यालयात संपर्क साधावा.

**अर्ज प्रक्रिया**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला htt{s://udyog.mahaswayam.gov.in या अधिकृत वेबसाइटवर नोंदणी करून अर्ज करावा. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराला ऑनलाइन अर्ज करून 'Letter of Intent (LOI)' घेणे आवश्यक आहे.

पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झाल्यानंतर ङजख समवेत लाभार्थ्यांने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा / उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ते सर्व कागदपत्र) घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे. कर्ज मंजूरीची पुर्ण प्रक्रीया बँक त्यांच्या नियमानुसार करीत असते, यामध्ये महामंडळ कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करीत नाही. कर्ज प्रकरण दाखल केल्यानंतर पोचपावती बँकेकडून घ्यावी. बँकेने कर्ज मंजुर केल्यानंतर कर्ज मंजूरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेब प्रणालीवर करावी. (उदा. ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्यात आलेल्या कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक EMI वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा (बँक स्टेटमेंट).

त्यानंतर बँकेमध्ये पुर्ण एचख हफ्ता भरल्यानंतरच महामंडळाच्या वेब प्रणालीवर ऑनलाईन क्लेम दाखल करावा. लाभार्थ्यांने एचख विहित कालमर्यादेत भरला असेल तरच त्याला व्याज परताव्याचा लाभ देता येईल. यामध्ये हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा म्हणून बँक स्टेटमेंट अपलोड करणे अनिवार्य असेल. लाभार्थ्याने दाखल केलेल्या क्लेमची पडताळणी महामंडळामार्फत करण्यात येऊन, लाभार्थ्यांस अनुज्ञेय असलेली व्याज परताव्याची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात ऑनलाईन स्वरुपात वितरीत करण्यात येईल. या योजनांच्या लाभाकरीता कोणत्याही सहकार्याची आवश्यकता असल्यास महामंडळाच्या जिल्हा समन्वयकांना संपर्क साधावा. जिल्हा समन्वयकांचा संपर्क वेब प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या योजनांच्या सहाय्याकरिता महामंडळाचे मुंबई मुख्यालय व जिल्हा निहाय जिल्हा समन्वयकांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्याही खाजगी व्यक्ती / संस्थेच्या आमीषाला बळी पडू नये.

या महामंडळाच्यावतीने तरुणांना व उद्योजकांना स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी केवळ भांडवली मदतच नव्हे तर सर्वांगीण मार्गदर्शन आणि आवश्यक प्रशिक्षणाचीही सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

महामंडळाच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांत राज्यातील हजारो तरुणांनी व्यवसाय, सेवा क्षेत्र, उत्पादन उद्योग, लघु व मध्यम उद्योग, तसेच शेतीपूरक व्यवसाय यांसारख्या विविध क्षेत्रांत स्वतःचा ठसा उमटवला आहे. या तरुणांनी उभारलेल्या उद्योगधंद्यांमुळे केवळ स्वतःचा रोजगार निर्माण झाला नाही, तर इतर अनेकांना देखील रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

राज्य शासनाच्या धोरणांतर्गत महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या या योजना ही फक्त लाभार्थ्यांच्या हितासाठी नसून महाराष्ट्राच्या भविष्याच्या पायाभरणीसाठी टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

ग्रामीण व शहरी भागातील युवकांना संधी देऊन त्यांना स्वावलंबनाच्या मार्गावर उभे करण्याचे कार्य या माध्यमातून होत आहे. या योजना ही केवळ आर्थिक मदत पुरवणारी नसून, आत्मनिर्भर महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि मराठा समाजातील घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी एक प्रभावी साधन ठरल्या आहेत.

**– शैलजा पाटील**
विभागीय संपर्क अधिकारी.

# गणेश भक्तांनी रामधाम तिर्थक्षेत्र मनसर येथे घ्यावे अष्टविनायकांचे दर्शन

**महाराष्ट्रात** अनेक भक्तगण अष्टविनायकाचे दर्शन घेण्यासाठी विविध क्षेत्रात जाऊन गणरायाचे दर्शन घेतात.त्याचप्रमाणे विदर्भातील महत्वपूर्ण अष्टविनायकाचे दर्शन सुध्दा सर्वच घेतात.परंतु आपल्याला रामधाम तिर्थक्षेत्र,मनसर रामटेक रोड येथे एकाच ठिकाणी आपल्याला अष्टविनायकाचे अद्भुत दर्शन लाभते. कारण याठिकाणी राज्यातील संपूर्ण अष्टविनायकांच्या प्रतीकृतिचे साक्षात चित्रिकरण असल्याने गणरायाचे दर्शन मिळते व हे स्थळ निसर्गरम्य परिसरात असल्याने संपूर्ण गौरी गणपतीचे साक्षात दर्शन अनुभवायला मिळते. रामधाम असे तिर्थक्षेत्र आहे की याठिकाणी निसर्गरम्य वातावरण आहेच सोबतच संपूर्ण देवी देवतांचे हुबेहूब दर्शन सुध्दा होते. पर्यटनाच्या माध्यमातून पर्यटक सुध्दा या स्थळाला मोठ्या प्रमाणात भेट देण्यासाठी आवर्जून येत असतात व देवदर्शन करतात. रामटेक विदर्भातील पावन क्षेत्र मानल्या जाते.कारण रामधाम येथे भाविकांना एकाच ठिकाणी बाबा अमरनाथ, बारा ज्योर्तिलिंग, अष्टविनायक, माता वैष्णोदेवी आणि विश्व प्रसिध्द ओम चे दर्शनासोबतच भगवान राम आणि भगवान कृष्णाच्या जिवनावरील आधारित अनेक प्रतीकृती पहायला मिळते. यासोबतच मनोरंजना करिता जादुचे खेळ, अनेक प्रकारचे झुले, बर्ड पार्क, ॲडवेंचर पार्क सोबतच लाईट हाऊस वॉटर पार्क व जलपरी शो चे आनंद घेऊ शकतात. भारतीय संस्कृति, संस्कारचे संपूर्ण दर्शन रामधाम तिर्थक्षेत्रात होते. रामधाम परीसर नैसर्गिक वातावरण,अत्यंत मनमोहक व नयनरम्य दृश्यांनी व अद्भुत सौंदर्यांनी नटलेले आहे, या ठिकाणी भक्तांना स्वर्गीय पवित्रतेचा दिव्य आभास होत असतो. त्यामुळे संपूर्ण गणेश भक्तांनी रामधाम तिर्थक्षेत्र, मनसर येथे येवून अष्टविनायकाचे दर्शन अवश्य घ्यावे.या ठिकाणी भगवान श्री राम काही काळ वास्तव्याला होते. त्यामुळेच मनसर येथील पर्यटन क्षेत्राला मुख्यत्वेकरून रामधाम तिर्थक्षेत्र, मनसर असे नाव देण्यात आले. हा संपूर्ण परिसर रामटेक क्षेत्रात येत असल्याने रामधाम तिर्थक्षेत्राला आगळे वेगळे महत्त्व आहे. त्यामुळे या क्षेत्राला पर्यटक तिर्थक्षेत्र व पर्यटन म्हणून भक्तगण आवर्जून भेट देतात.जय श्री गणेश.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# मागासवर्गीय वस्तीगृहातील मुलींनी वैजापूरात श्री गणेशोत्सव पाहण्याचा घेतला आनंद



वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) – येथील निर्मला इन्स्टिट्यूटच्या ४८ मागासवर्गीय मुलींनी सोमवार (ता.०१) रोजी सायंकाळ सहा ते नऊ वाजेपर्यंत शहरातील विविध गणेश मंडळाच्या श्री गणेश मूर्तींना भेट देऊन मूर्तींचे दर्शन घेतले शहरात मोठ्या गणेश मंडळांनी आकर्षक व मानभावक श्री गणेश मूर्ती बसविलेल्या आहेत.

या मुलींनी सर्व गणेश मंडळाना भेटी देऊन गणेशोत्सवाचा आनंद घेतला.या समयी त्यांच्या वस्तीगृह प्रमुख मार्गारिट रोद्रीग्ज, तारिका इक्का व माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत ही होते.

# सत्याचे पालन करण्यासाठी धैर्य, संयम व स्पष्ट वक्तेपणा आवश्यक – आ.डॉ.प्रणासागरजी महाराज

## राजाबजार जैन मंदिरात राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांचा ७ वा समाधी दिवस साजरा



छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे आचार्य डॉ. प्रणामसागरजी महाराज यांचा भक्तांबर प्रभावना चातुर्मास उत्साहात सुरु असुन त्यांच्या सानिध्यात पर्युषण पर्वा निमीत्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे विविध धार्मिक कार्यकमांचे आयोजन करण्यात आले असुन आज सर्वप्रथम सकाळी भगवान शांतीनाथांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला.

यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी शैलेद्र सेठी, शांतीधारा कर्ता प्रदिपकुमार अजितकुमार कैलासचंद सुनिल पाटणी परिवार यांच्या वतीने शांतीधारा करण्यात आली. तसेच आज राष्ट्रसंत तरुणसागरजी महाराज यांच्या ७ व्या समाधी दिवस निमीत्त फोटोला माल्यार्पन करण्याचे सौभाग्य बाहुबली चेतन गंगवाल परिवार यांना मिळाला. तसेच डॉ. प्रणामसागरजी महाराज यांच्या पादपक्षालनाचा मान डॉ.आशिषकुमार अशोककुमार पाटणी यांना मिळाला. तसेच विविध भक्तांकडुन भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला.

आज उत्तम सत्य या दिवशी डॉ. प्रणामसागरजी महाराज यांनी उदबोधन करतांना सांगीतले की, सत्याचे पालन करण्यासाठी धैर्य, संयम व स्पष्ट वक्ते पणा आवश्यक आहे. सत्य हे कधी कधी कटु असते पण तेच दिर्घकाळ टिकणारे असते. सत्य मानव धर्माचे मुळ आहे सत्य बोलणार मनुष्य समाजात विश्वासार्ह ठरतो आणि आत्म्याचे शुध्दी साधतो. विश्वातील सर्वात मोठा चमत्कार सत्यच आहे असेही आचार्यश्रींनी सांगीतले व पुढे म्हणाले की, क्रांतीकारी राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज हे त्यांचे कडवे प्रवचन या व्याख्यानाव्दारे अतिशय प्रसिध्द होते. देशातील पंतप्रधान व राष्ट्रपती सोडुन दिल्लीतील लाल किल्यावर भाषण करणारे ते पहिले जैन मुनि होते. देशातील विविध राजकीय पक्षाचे व समाजाचे नेते समाधीस्त तरुणसागरजी महाराज यांचे आदर करत असत.

यावेळी कार्यकमाचे प्रास्ताविक पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी यांनी केले. यावेळी पंचायत सचिव प्रकाश अजमेरा, किरण पहाडे, महावीर ठोले, यतीन ठोले, ललीत पाटणी, निता ठोले, चंदा कासलीवाल, सतोश सेठी अरून पाटनी जितेंद्र पाटनी चातुर्मास कमिटी अध्यक्ष अनिल कासलीवाल, डॉ. प्रकाश पापडीवाल, अप्पु पाटणी, गुरूपरिवाराचे सुनिल सेठी, काजु कासलीवाल, सागर पाटणी, विजय चांदीवाल, निलेश सेठी, समीर ठोले अमोल पाटणी, अशोक अजमेरा, पवन पाटणी, स्नेहल पहाडे, शुभम पांडे, मनि लोहाडे, अंकुर साहुजी, श्रेणीक कासलीवाल, सुरेखा पाटणी, शैलेश पहाडे, वैभव काला, राजकुमार पांडे, कांताबाई पहाडे, प्रमोद पांडे, रवि सेठी, संजय पहाडे, डी बी पहाडे रमेश पाटणी, मंजु ठोले, बापु कासलीवाल आदीची मोठया संख्येने उपस्थिती होती. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

# गणेशोत्सवाची प्रबोधनात्मक भित्तिपत्रके लावल्यावरून सनातनच्या साधकाचा पोलिसांकडून बेकायदेशीर डांबून छळ!

## दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाईची सनातन संस्थेची मागणी



गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील शिवडी परिसरात 'आदर्श गणेशोत्सव कसा साजरा करावा' अशा आशयाची प्रबोधनात्मक भित्तिपत्रके लावणाऱ्या श्री. संदीप हरिश्चंद्र शिंगाडे या सनातनच्या साधकाला किडवाई मार्ग पोलिसांनी कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेशिवाय ताब्यात घेऊन दीड तास त्यांचा छळ केला. पोलिसांच्या या मनमानी आणि दडपशाहीचा आम्ही सनातन संस्थेच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करतो. या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री आणि मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिली.

२६ ऑगस्ट २०२५ या दिवशी रात्री ७:३० वाजता 'आदर्श गणेशोत्सव कसा साजरा करावा' या विषयाचे भित्तिपत्रक लावत असतांना कोळेकर, कांबळी आणि रामसिंग या नावाच्या पोलिसांनी सनातनचे साधक श्री. शिंगाडे यांना कोणतेही वॉरंट किंवा कारण न देता जबरदस्तीने पोलीस ठाण्यात नेणे; रात्री ९ वाजेपर्यंत घाडगे नावाच्या पोलीस अधिकाऱ्याने चौकशीच्या नावाखाली त्यांच्या मानसिक छळ करणे; चौकशीदरम्यान धमक्या देणे; वैयक्तिक मोबाईल काढून त्यातील वैयक्तिक माहिती घेणे; त्यांच्या फोनमधील कॉल लॉग्स व वैयक्तिक कागदपत्रांचे फोटो काढणे; साधकाला त्यांच्या वकिलाशी वा कुटुंबियांशी संपर्क साधू न देणे; तसेच रात्री ९ वाजता त्यांना कोणताही कागदोपत्री पुरावा न देता सोडून देणे, ही संपूर्ण कारवाई 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' (BNSS) च्या कलम ३५ चे सरळ उल्लंघन करणारी आहे. तसेच हा पोलिसांनी केलेल्या अधिकारांच्या दुरुपयोगाचा गंभीर नमुना आहे, असे श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

श्री. अभय वर्तक पुढे म्हणाले की , गणेशोत्सवाच्या काळात गणेशपूजनाचे शास्त्र, गणेशाची कृपा कशी संपादावी, आदर्श गणेशोत्सव कसा साजरा करावा, याविषयी प्रबोधन करणे गुन्हा आहे का ? हा भारतीय संविधानाने दिलेल्या हिंदूंच्या धार्मिक स्वातंत्र्यावर पोलीस प्रशासनाने घातलेला घाला आहे.

कधी पोलिसांनी मुसलमान अथवा ख्रिश्चन धर्मियांना त्यांच्या धार्मिक कृतीविषयी माहिती सांगतांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेऊन छळ करण्याचे धाडस केले आहे का ? याचे उत्तर किडवई मार्ग पोलिसांनी जनतेला द्यावे ! हिंदू सणांच्या वेळी हिंदूंची ही मुस्कटदाबी आम्ही कदापी सहन करणार नाही. जर दोषी अधिकाऱ्यांवर मुंबई पोलीस आयुक्तांनी तात्काळ कायदेशीर कारवाई केली नाही, तर आम्ही या विरोधात महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करू, तसेच दोषींना शिक्षा होईपर्यंत सनातन संस्था या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करणार आहे, असेही श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

**– अभय वर्तक,**
प्रवक्ता, सनातन संस्था,
(संपर्क : ९९८७९२२२२२)

# कांदा खरेदी करूनही नाफेड', एनसीसीएफने थकविले बळीराजाचे पैसे

नाशिक, दि. २ (प्रतिनिधी) – राज्यामध्ये केंद्र सरकारच्या नाफेड आणि एनसीसीएफ या दोन संस्थांनी शेतकऱ्यांच्या कांदा खरेदी करून देखील पैसे न दिल्याने बळीराजा आता हवालदिल झाले. याबाबत चौकशी करण्यास गेले असताना देखील या दोन्हीही संस्थांचे अधिकारी काहीही उत्तर देण्यात तयार नाही. त्यामुळे सणासुदीच्या दिवसात कांदा उत्पादक पैशाअभावी हवालदिल झाला असल्याची परिस्थिती आहे. मागील काही दिवसापासून सतत त्याने कांद्याचा प्रश्न हा गाजत आहे. कधी कांद्याचे भाव कमी होतात तर कधी कांद्याचे भाव वाढत आहे. कांद्याचे भाव स्थिर राहावे यासाठी म्हणून केंद्र सरकारच्या उपभोक्ता मंत्रालयाने कृषी मंत्रालयाच्या सहकार्यातून 'नाफेड' व 'एनसीसीएफ' या दोन एजन्सीच्या माध्यमातून कांदा खरेदी करून तो बाजारात कमी भावामध्ये आणण्याचे ठरवले आणि त्या दृष्टिकोनातून प्रत्यक्ष काम काजाला सुरुवात झाली.

सातत्याने शेतकरी मागील काही दिवसांपासून 'नाफेड' व 'एनसीसीएफ' या दोन्हीही एजन्सीच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत आहेत. या दोन्हीही संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर बोगस कांदा खरेदी झाली आहे अशा स्वरूपाच्या तक्रारी देखील उपभोक्ता मंत्रालयाकडे करण्यात आलेल्या होत्या पण त्या दृष्टिकोनातून सुरुवातीला कारवाई झाली नाही पण याबाबत ज्यावेळी केंद्र सरकारच्याच लक्षामध्ये काही गोष्टी आल्यानंतर त्यांनी त्याची चौकशी केली नाशिकच्या 'नाफेड' व 'एनसीसीएफ' मधील अधिकाऱ्यांवरती कारवाई देखील केली आणि त्यानंतर काही प्रमणात हा पुरवठा सुरळीत होईल यातून मार्ग निघेल अशी अपेक्षा असताना देखील ती प्रत्यक्षात खरी होऊ शकली नाही.

आता तर किंमत स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत 'नाफेड' व 'एनसीसीएफ' या दोन नोडल एजन्सीने व शेतकरी कंपन्यांच्या माध्यमातून प्रामुख्याने नाशिक, अहिल्यानगर, पुणे व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये ३ लाख टन कांद्याची खरेदी केली. दोन महिने उलटूनही कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना कष्टाचे पैसे मिळालेले नाहीत. परिणामी, ऐन सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना खरेदीदारांचे उंबरे झिजवावे लागत आहेत.

बफर स्टॉकसाठी खरेदी करण्यात आलेला कांदा सध्या खरेदीदार संस्थांच्या ताब्यात आहे. खरेदीवेळी ७२ तासांत पैसे मिळतील असे सांगण्यात आले. मात्र आता दोन महिने उलटूनही पैसे खात्यावर आले नाहीत. यामागे कांदा खरेदी व प्रत्यक्ष उपलब्ध साठ्याचा ताळमेळ लागत नसल्याने हे पैसे ग्राहक व्यवहार विभाग अदा करत नसल्याचे सांगण्यात येत आहे. या सर्व व्यवहारामुळे आता कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले असून कांदा विकूनही हातामध्ये पैसा नाही त्यामुळे सण कसा साजरा करावा नवीन पेरणी कशी करावी यासारख्या विवंचनेत शेतकरी वर्ग आहे.

# समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा उन्न 'ती' चा गणेश उत्सव



पुणे दि. २ (विजय न्यायाधीश यांजकडून) समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा पिंपरी चिंचवड परिसरातील एकमेव महिला मंडळाचा गणेश उत्सव म्हणून उन्नती सोशल फाउंडेशनच्या गणेशोत्सवाचा उल्लेख केला जातो. गेल्या सात वर्षांपासून विविध उपक्रमाव्दारे वैशिष्ट्यपूर्ण ठरलेल्या या उत्सवाने यंदाही आपली परंपरा कायम ठेवली आहे.

'मुर्ती आमची किंमत तुमची' या उपक्रमा अंतर्गत दरवर्षी परिसरातील नागरिकांना आणि गावठाणातील सार्वजनिक गणेश मंडळांना शाडू मातीपासून तयार करण्यात आलेल्या गणेशमुर्ती दिल्या जातात. त्यासोबतच विविध वनस्पतींची रोपे असलेल्या कुंड्यांचेही यावेळी वाटप करण्यात येते. त्याआधी लहान मुलांसाठी ' पर्यावरण पूरक श्री गणेशा कार्यशाळा ' या अंतर्गत शाडू मातीपासून गणपतीची मुर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. या परंपरेनुसार यंदा एक हजार श्रींच्या मुर्तींचे वाटप करण्यात आले. दहा दिवस चालणाऱ्या उन्नतीच्या या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे उद्योगपतींपासून ते स्वच्छता कर्मचाऱ्यांपर्यत समाजातील विविध घटकांना या उत्सवात सहभागी करुन घेतले जाते. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिक, पोलिस, लष्करातील जवान, राजकीय क्षेत्रातील व्यक्ती, कलावंत, खेळाडू, दिव्यांग , तृतीयपंथी, परितक्त्या, विधवा, सफाई कामगार आदींच्या हस्ते सकाळी अणि संध्याकाळी होणाऱ्या गणेश आरतीचा मान दिला जाऊन खऱ्या अर्थाने सामाजिक समरसतेचा संदेश दिला जातो.

याव्यतिरिक्त भारतीय वाद्य संस्कृती जपणाऱ्या ढोल – ताशा आणि लेझिम पथकातील वादक आणि नृत्य कलावंतांना रोख स्वरूपात बक्षिस आणि सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येते.

उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संचालक डॉ. कुंदाताई भिसे आणि संजय भिसे यांच्या संकल्पनेतून दरवर्षी साजरा केल्या जाणाऱ्या या उत्सवाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली असून हा महोत्सव लोकाभिमुख होत चालला आहे.

# वधू-वरांची दिवाळी अंकात निशुल्क नोंदणी

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – ब्रह्मवृंद वैभव वधु वर सुचक केंद्र यांचे तर्फे ५०० वधूवरांची माहिती असलेला दिवाळी अंक २२ ऑक्टोबर २०२५ ला प्रसिद्ध होणार आहे. या दिवाळी अंकात वधू-वरांची माहिती निशुल्क पद्धतीने नोंदवता येईल. वधू वर पालकांनी आपल्या पाल्यांची माहिती , पासपोर्ट आकाराच्या फोटोसह ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पाठवावी. संपर्कासाठी कृपया दत्तात्रय पिंपळे ९४० ३९ २२ ८६२, श्रीपाद कुलकर्णी ९८६०२५६ ३८९, सौ.अश्विनी लोटांगणे ९०११६२६३१५, सौ. सुजाता मांडे ९९६ ०५ ३५२ ० ५, सौ. दीप्ती देशपांडे ९५४ ५५२० ६६८ वरील फोन नंबर उपलब्ध आहेत.

हा विशेषांक राज्यस्तरीय असल्यामुळे अधिकाधिक वधू-वर पालकांनी या नि:शुल्क सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन ब्रह्मावृंद वैभव वधु वर सुचक केंद्र यांचे तर्फे करण्यात आले आहे.

# नारळ शेती: अनेक देशांत चांगला रोजगार

**(जागतिक नारळ दिन विशेष.)**

**नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हटलं जातं. त्यापासून निर्माण होणाऱ्या सगळ्या गोष्टी या मनुष्याला उपयोगी पडतात. नारळ हा त्यापैकीच एक. नारळाचा उपयोग खाण्यासाठी, ओषधांसाठी, तेलासाठी तसेच इतर अनेक गोष्टींसाठी केला जातो. नारळाच्या शेतीपासून जगातल्या अनेक देशांत चांगला रोजगार मिळत आहे. त्यामुळे नारळाचे महत्व आणि त्याचा वापर याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २ सप्टेंबर हा जागतिक नारळ दिन म्हणून साजरा केला जातो. याविषयीची महत्वपूर्ण माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींच्या सदर लेखातून वाचा... संपादक.**

दरवर्षी २ सप्टेंबर रोजी जागतिक नारळ दिन साजरा केला जातो. नारळाची बहुमुखी उपयुक्तता आणि त्याची मागणी लक्षात घेऊन दि. २ सप्टेंबर १९६९ रोजी एशियन आणि पॅसिफिक कोकोनट कम्युनिटी सुरू झाली. जकार्ता, इंडोनेशियात या दिवशी एपीसीसीची स्थापना देखील झाली. आपल्या देशात अनेक शतकांपासून नारळाचे आध्यात्मिक आणि औषधी मूल्य आहे. याला जर निसर्गाने दिलेली भेट म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. नारळाच्या प्रत्येक भागाला खूप महत्त्व आहे. हे उशीरा पचवणारा, मूत्राशय साफ करणारा, ग्रहण करणारा, पौष्टिक, शक्तिशाली, रक्ताविरोधी, जंतुनाशक, जंतुरोधक आणि वात-पित्त नष्ट करणारा आहे. त्याच्या थंड प्रभावामुळे, त्याचे पाणी सर्व शारीरिक समस्यांपासून आराम देते.

जागतिक नारळ दिन हा सर्वप्रथम सन २००९ साली एशिया-पॅसिफिक प्रदेश म्हणजे आशिया-प्रशांत महासागराच्या प्रदेशातील समुदायाकडून साजरा करण्यात आला. जागतिक स्तरावर नारळाच्या शेतीबद्दल जागरुकता निर्माण करणे आणि त्याला प्रोत्साहन देणे हा उद्देश जागतिक नारळ दिन साजरा करण्यामागे आहे. त्यामुळे नारळाच्या व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळू शकेल. जगभरात नारळाचे उत्पादन घेतले जाते, पण आग्नेय आशियात त्याचे सर्वाधिक उत्पादन घेतले जाते. नारळाच्या उत्पादनाच्या बाबतीत इंडोनेशियाचा जगात पहिला क्रमांक लागतो. भारतातही कोकण किनारी, गुजरात पासून ते केरळपर्यंत आणि पूर्व किनाऱ्याच्या पश्चिम बंगालपासून ते तामिळनाडूपर्यंत नारळाचे उत्पादन घेतले जाते.

नारळाचे फायदे: अगदी तहान भागवण्यापासून ते फर्निचर तयार करण्यापर्यंत नारळाचे असंख्य असे फायदे आहेत. नारळामध्ये कार्बोहायड्रेट्स, मॅगनिज आणि प्रोटिन मोठ्या प्रमाणावर असतं. त्यामुळे आपले आरोग्य चांगलं राहण्यास मदत होते. म्हणूनच आजारी व्यक्तींना नारळाचे पाणी प्यायचा सल्ला दिला जातो. नारळाचे दूध आणि तेल हे आपल्या त्वचेला ग्लो आणण्यासाठी फायदेशीर आहे.

नारळामध्ये आयर्न आणि सेलेनियम असते. ते एक ॲन्टिऑक्सिडन्ट स्वरुपात काम करते, त्यामुळे लाल रक्त पेशींचे संरक्षण होते. तसेच नारळ खाल्याने कोलेस्टोरॉलचा स्तर सुधारतो. नारळात व्हिटॅमिन, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम हे घटक असतात. त्यामुळे ब्लड प्रेशर नियंत्रणात येते. नारळाचे पाणी रोज पिल्यास शरीरातील ग्लुकोजचे प्रमाण स्थिर राहते.

!! जागतिक नारळ दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

– संकलन व सुलेखन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर !

**शिक्षण** हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने 'शिक्षण सर्वांसाठी' हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली.

या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर मा. न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे.

मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जातवैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थांनी तक्रारी केल्या होत्या याची राज्यशासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५) – सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय,
३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

### नेत्रदान पंधरवडा जनजागृती

# मरणोत्तरही जग पाहण्यासाठी करा नेत्रदान-डॉ.अर्चना पाटील वरे






छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- बुब्बुळामुळे येणारे अंधत्व दूर करण्यासाठी मरणोत्तर नेत्रदान करुन अंध व्यक्तीस बुब्बुळाचे प्रत्यारोपण करणे हा एकमेव मार्ग होय. अशाप्रकारे नेत्रदान करुन आपण दृष्टिचे दान करुन मरणोत्तर ही हे जग पाहू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करावा,असे आवाहन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नेत्रविभागाच्या प्रमुख डॉ. अर्चना पाटील वरे यांनी केले.

नेत्रदान पंधरवड्यानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात 'नेत्रदान व नेत्राची घ्यावयाची काळजी', याबाबत डॉ. अर्चना पाटील वरे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे अध्यक्षस्थानी होते. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, एकनाथ बंगाळे, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, नेत्रतज्ज्ञ डॉ. शोभा झंवर आदी उपस्थित होते.

डॉ. अर्चना पाटील म्हणाल्या की, आपल्या देशात बुब्बुळामुळे आलेल्या अंधत्वाचे प्रमाण मोठे आहे. ह्यापैकी १टक्के लहान बालके असतात. दर वर्षी ३० हजार लोकांना नेत्रबुब्बुळांची गरज भासते. प्रत्यक्षात केवळ ३ हजार बुब्बुळेच प्राप्त होतात. त्यामुळे नेत्रदान विषयक जनजागृती होणे आवश्यक आहे. नेत्रदान कुणीही करु शकतो. मृत्यूनंतर ६ तासांच्या आत मृतदेहाचे डोळे काढण्याचे काम नोंदणीकृत वैद्यकीय अधिकारी करतात. त्यामुळे नेत्रदानासाठी आपले नाव नोंदवा. मृत्यूनंतर जवळच्या नेत्रपेढीशी आपल्या नातेवाईकांमार्फत संपर्क साधून नेत्रदान केले जाते,अशी माहिती डॉ. पाटील यांनी दिली.

नेत्रदानाविषयक जनजागृतीपर पथनाट्य यावेळी सादर करण्यात आले. प्रास्ताविक एकनाथ बंगाळे यांनी केले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आपला मनोगतातून नेत्रदान संकल्प करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## गृहपयोगी संचाचे वाटप पूर्णतः नि:शुल्क-पालकमंत्री संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ व मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. यांच्या मार्फत जिल्ह्यातील १५ वितरण केंद्रांवर होत असलेल्या गृहपयोगी संचाच्या वाटपाबाबतच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजयजी शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यात त्यांनी हे वितरण पूर्णतः निःशुल्क असून कुणाकडून पैशांची मागणी केल्यास तात्काळ पोलिसांत तक्रार द्यावी असे आवाहन त्यांनी केले असल्याचे सहाय्यक कामगार आयुक्त ग.भा. बोरसे यांनी कळविले आहे.

बैठकीत वितरण केंद्र प्रतिनिधींना संचाचे वाटप मंडळाच्या नियमानुसार पूर्णतः नि:शुल्क करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. केंद्रावर आर्थिक व्यवहार होत असल्यास संबंधित केंद्रावर तातडीने कारवाई करून ते बंद करण्यात येईल, असेही पालकमंत्री यांनी सूचना केल्या.

संच वाटप मंडळाच्या आदेशानुसार भेट पद्धतीने होणार असून, लाभार्थ्यांनी http://hikit.mahabocw.in/appoinment या संकेतस्थळावर भेट देऊन नियोजित वेळ घेऊन संच मिळवण्यासाठी दिनांक व वितरण केंद्राची निवड करावी लागणार आहे. कामगारांनी ओळखपत्र/आधारकार्ड व नियुक्ती पत्र घेऊन उपस्थित राहिल्यानंतरच संच प्रत्यक्ष दिला जाईल. कामगारांना आवाहन करण्यात आले आहे की, कोणत्याही एजंट, संघटना किंवा त्रयस्थ व्यक्तीकडे न वळता थेट मंडळाच्या प्रणालीतून संच मिळवावा. पैशांची मागणी केल्यास तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा नियुक्ती पत्रावरील क्रमांकावर तक्रार दाखल करावी.

## बाबासाहेबांमुळेच डॉक्टर, गरजूंना मोफत सेवा देणार; ३५० डॉक्टरांचा निर्धार

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील प्रत्येक व्यक्तीवर सामाजिक जबाबदारी दिलेली आहे. त्या जाणिवांनी काम केलं गेलं पाहिजे. आम्ही सर्व रुग्णावर मोफत उपचार करणार आहोत. आमच्या ओपीडीला सर्व तज्ज्ञ डॉक्टर सेवा देणार आहेत. सर्व डॉक्टरांनी वर्गणी जमा करून ही ओपीडी सुरू केली, अशी माहिती डॉ. प्रमोद दुथडे यांनी दिली.

शहरातील बहुजन समाजातील ३५० डॉक्टर एकत्र येऊन डॉ. आंबेडकर डॉक्टर असोसिएशन हेल्थ केयर फाउंडेशन स्थापना केली आहे. फाउंडेशनमार्फत ३६५ दिवस मोफत अमरप्रीत चौकातील बाह्य रुग्ण सेवेच्या रुग्णालयाचे उद्घाटन तथागत भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्प अर्पण करून रविवारी झाले.फुले, शाहू, आंबेडकर यांच्या मुळेच बहुजनांना शिक्षणाची संधी मिळाली. वैद्यकीय सेवेसारख्या महत्वाच्या क्षेत्रात येता आले. त्यांच्या उपकारातून उतराई होणे तर शक्य नाही, परंतु किमान त्यांच्या मार्गावर काही अंतर चालणे शक्य आहे, असे विचार मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

भदंत कश्यप महाथेरो यांच्यासह भिक्खू संघ डॉ. एच. बी. दहाट, डॉ. के. डी. गायकवाड, डॉ. शालिनी दहाट, डॉ. एम. डी. गायकवाड. डॉ. एम. बी. काळबांडे, डॉ. चंद्रकात थोरात, डॉ. भास्कर खैरे, डॉ. वीणा एम. गायकवाड, डॉ. शिवराज लाळीकर, डॉ. प्रभा खैरे, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. भारत सोनवणे, डॉ. विशाल वाठोरे, डॉ. चैतन्या पाटील, डॉ. सागर वानखडे, डॉ. आर. जी. नरवडे, डॉ. बी. एन. गडवे, डॉ. मानव पगारे. डॉ. आनंद तारू, डॉ. संतोष गायकवाड, डॉ. प्रकाश साळवे, डॉ. सर्जेराव घोरपडे, डॉ. आनंद भूक्तर, डॉ. मनोज भुक्तर, डॉ. कल्पना गंगावणे, डॉ. पलुवी अभ्यंकर, डॉ. साहेबराव वाकडे हे या ओपीडीत सेवा देणार असून, त्यांची कार्यक्रमाला उपस्थिती होती. शरद जाधव, के. बी. दिवेकर, दादाराव खंडागळे, सविता अभ्यंकर, सुनील पगडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## वाहतूक मार्गात बदल

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- हजरत शेख मुन्तजबोद्दीन जर जरी बक्ष यांचा ७३९ वा उर्स महोत्सव दि. १ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर दरम्यान खुलताबाद येथे होत आहे. या कालावधीत वाहतुकेची कोंडी निर्माण होऊ नये यासाठी खुलताबादला जाणारी व येणारी जड वाहतूक मार्गात बदल करण्यात येत असल्याचे आदेश पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी निर्गमित केले आहेत.

**वाहतुक मार्गातील बदल याप्रमाणे-**

१. कन्नड – वेरुळ – खुलताबाद – दौलताबाद – छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहतूक - कन्नड – वेरुळ – कसाबखेडा फाटा – वरझडी – माळीवाडा – शरणापूर फाटा – मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे या मार्गाने जाईल

२. छत्रपती संभाजीनगर – दौलताबाद – खुलताबाद – वेरुळ – कन्नडकडे जाणारी वाहतूक- छत्रपती संभाजीनगर – शरणापूर फाटा – माळीवाडा – वरझडी – कसाबखेडा फाटा – वेरुळ मार्गे कन्नड कडे जाईल.

३. फुलंब्री – सुलतानपुर – खुलताबाद – वेरुळ – कन्नड कडे – जाणारी वाहतूक फुलंब्री – छत्रपती संभाजीनगर – शरणापूर फाटा – माळीवाडा – वरझडी – कसाबखेडा फाटा – वेरुळ मार्गे कन्नडकडे जाईल,असे कळविण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका लोकशाही दिन ०८ सप्टेंबर रोजी

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, महानगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी राबविण्यात येतो. परंतु सप्टेंबर महिन्यातील पहिल्या सोमवारी दिनांक ०१ सप्टेंबर रोजी खुलताबाद येथे जर जरी जर बक्ष ऊर्स असल्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून स्थानिक सुट्टी घोषित करण्यात आली होती. त्यामुळे माहे सप्टेंबर २०२५ चा 'ङमहानगरपालिका लोकशाही दिनङ सोमवार दि.०८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रशासकीय समिती कक्ष,मनपा मुख्य कार्यालय येथे मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दिलेल्या सुधारीत परिपत्रकानुसार लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर दिनांक २५/०८/२०२५ पर्यंत विहीत नमुन्यात आवश्यक कागद पत्रासह अर्ज दिलेल्या नागरीकांनाच दि.०८ सप्टेंबर २०२५ रोजी समक्ष अर्ज सादर करण्याची परवानगी राहील, याची नोंद घ्यावी.

ज्यांनी या पुर्वीच्या महानगरपालिका लोकशाही दिनात तक्रार अर्ज दिलेले असतील परंतु त्याच प्रकरणांत अद्याप कार्यवाही झाली नाही अशा प्रकरणात त्यांनी पुन्हा अर्ज देण्याची आवश्यकता नाही असे उप आयुक्त तथा मुख्य समन्वयक लोकशाही दिन लखीचंद चव्हाण यांनी कळविले आहे.

(पान १ वरुन)

### महाराष्ट्र सरकारची शिष्टाई...

आहे. माझ्या समाजाचं कल्याण झालं आहे', असं म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी सर्व आंदोलकांचे आभार मानले आहेत.

जरांगे यांनी मंत्र्यांसमोर जर या जीआरमध्ये काही दगाफटका झाला तर मंत्र्यांना राज्यात फिरू देणार नाही, असा इशारा दिला आहे. तुमच्या ताकदीवर आपण जिंकलो. मागण्या मान्य झाल्या की, सगळे मराठे आनंद व्यक्त करत मुंबईच्या बाहेर पडतील. सरकारने एकूण ३ जीआर काढावेत. सातारा, हैदराबाद गॅझेटियरचा वेगवेगळा जीआर आणि आमच्या इतर मागण्यांचा वेगळा जीआर काढावा, अशी अट जरांगे यांनी विखे पाटलांसमोर ठेवली होती.

मनोज जरांगे यांनी यावेळी मराठा व कुणबी एकच असल्याच्या मुद्यावर सरकारला २ महिन्यांची मुदत देण्याची घोषणा केली. ते म्हणाले, आम्ही सरकारकडे ५८ लाख नोंदींच्या आधारावर मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढण्याची मागणी केली होती. त्यावर सरकारने हा मुद्दा क्लिष्ट असल्यामुळे त्यावर निणऱ्य घेण्यासाठी महिन्याभराची मुदत मागितली होती. मी त्यांना दीड महिन्यांची मुदत दिली. पण विखे पाटलांचा हात थोड जड आहे. त्यांनी २ महिन्यांचा वेळ मागितला. त्यानुसार आम्ही त्यांना ही मुदत दिली. या मुदतीनंतर मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढला जाईल.

हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी, आंदोलनात बळी गेलेल्या कुटुंबीयांच्या वारसांना नोकरी, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी मान्य, मराठ्यांच्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतीत लावणार, वंशवळ समिती गठित करणे, सगेसोयऱ्यांची छाननी करण्याचा मुद्दा, मराठा-कुणबी एक असल्याचा जीआर दोन महिन्यांत काढण्यात येणार, सातारा, औंध गॅझेटबाबत १५ दिवसांत लागू करण्याचं आश्वासन अशा मागण्या राज्य सरकारने मान्य केल्याल्याची माहिती मनोज जरांगे यांनी दिली आहे.

### मराठा समाजाच्या अपेक्षांना..

असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

'शासनाच्या या ठोस व सकारात्मक भूमिकेला प्रतिसाद देत मनोज जरांगे पाटील यांनी आपले आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या भावना आणि मराठा समाजाच्या अपेक्षांना न्याय देण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. समाजहिताचे प्रश्न संवाद आणि ठोस निर्णय प्रक्रियेतूनच मार्गी लावले जातील. मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी महाराष्ट्र शासन वचनबद्ध आहे. तसेच मराठा समाजासह संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. त्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील, असा विश्वास सरकारच्यावतीने देतो. या निर्णयाबद्दल मी मराठा समाजाचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. असे अजित पवार म्हणाले.

### जरांगेचें आंदोलन मागे, पण...

संघटनेने दिला आहे. त्यामुळे जरांगेचे आंदोलन संपले असले तरी ओबीसींची मागणी मान्य न झाल्याने त्यांचे आंदोलन सुरूच राहणार असे संकेत ओबीसी नेत्यांनी दिले आहे. त्यामुळे सरकार आता ओबीसींबाबत कोणती भूमिका घेणार याकडे या समाजाचे लक्ष लागले आहे.

२०२३ मध्ये ओबीसी संघटनांनी आंदोलन केले होते तेव्हा तत्कालीन उपमुख्यमंत्री व आत्ताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी संघटनांना त्यांच्या कोट्यातून मराठ्यांना आरक्षण देणार नाही,असे आश्वासित केले होते. तेच आश्वासन या संघटनांना पुन्हा मुख्यमंत्र्यांनी द्यावे,अशी मागणी आहे.

### मुंबईतील आंदोलनावरुन...

खडे बोल सुनावले आहेत. दरम्यान, सदर प्रकरणाची सुनावणी उद्या (बुधवार, ३ सप्टेंबर) सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. यासाठी मनोज जरांगे यांच्या वकिलांनीच न्यायालयाकडे विनंती केली होती.

विधीज्ञ सतीश मानेशिंदे यांनी या सुनावणीवेळी मनोज जरांगे व मराठा आंदोलकांची उच्च न्यायालयात बाजू मांडली. यावेळी न्यायालयाने मानेशिंदे व राज्य सरकारला फटकारलं.

### मराठा समाज सामाजिकदृष्ट्या...

आरक्षण देता येणार नाही, याचे कारण असे आहे की कालेलकर आयोग जे आहे, १९६० च्या दरम्यान निर्माण झाले होते. त्यांनी मराठा समाजाला पुढारलेला समाज असल्याचे सांगितले होते. त्यानंतर मंडल आयोगाने सांगितले की हा समाज पुढारलेला आहे. त्यानंतर मग मंडल आयोग सगळीकडे लागू झाल्यानंतर १९९३ च्या आधी आयोग ही कल्पना नव्हती. त्यावेळी विधानसभेत निणऱ्य घेतले जायचे. ९३ साली इंद्रा सहाणी केस जेव्हा झाली तेव्हा निणऱ्य घेण्यात आला की आयोग स्थापन केले जाईल.

### देशात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण...

परदेशी बनावटीच्या गाड्यांच्या कंपन्याच्यावतीने पेट्रोल मध्ये इथेनॉल मिश्रण करण्यात येवू नये याकरिता सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल करण्यात आली होती. यावर सर्वोच्च न्यायालयानं महत्वपूर्ण निकाल दिला आहे. सध्या भारतामध्ये विकल्या जाणाऱ्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रित केले जात आहे. भारतात ऊसापासून व धान्यापासून जवळपास १६८५ कोटी लिटर इथेनॉलचे उत्पादन घेतले जात आहे. देशातील मुठभर क्रुड ऑईलचे व्यापारी व काही वाहन कंपन्यांनी हेतुपुर्वक स्वत:च्या स्वार्थासाठी इथेनॉल बाबत गैरसमज पसरवित आहेत.

### ...तर सर्व मराठ्यांना..

मराठा कुणबी आणि कुणबी मराठा या तीन कॅटेगरीमध्ये हे प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या प्रमाणपत्रांची पडताळणी पूर्ण झाली की त्या मराठ्यांना ओबीसीचे लाभ मिळणार आहेत. यामध्ये सरसकट मराठे येणार नाहीत. तर गरीब मराठे, अल्पभूधारक मराठे यांची सोय करण्यात आली आहे. तसेच त्रिसदस्यीय समिती ही गावपातळीवर असणार आहे. १९६७ च्या पुर्वीचे पुरावे असतील तर ते नाहीतर एका शपथपत्रावर मराठ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे, एवढी ही सोपी प्रक्रिया करण्यात आल्याचे शिंदे म्हणाले.

### अफगाणिस्तान भूकंपातील...

रविवारी रात्री अफगाणिस्तानातील जलालाबादजवळ ६.० तीव्रतेचा भूकंप झाला. त्यावेळी बहुतेक लोक झोपले होते, त्यामुळे ते इमारतींच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. अफगाणिस्तानच्या तालिबान सरकारने जगभरातून मदत मागितली आहे. यानंतर, भारताने मदतीसाठी काबूलला १००० तंबू पाठवले आहेत. तसेच, काबूलहून कुनारला १५ टन अन्नपदार्थ पाठवण्यात आले आहेत.

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी एक्स वर लिहिले की, भारत मदत साहित्य पाठवत राहील. २०२१ मध्ये तालिबान सरकार स्थापन झाल्यानंतर, आंतरराष्ट्रीय संस्थांनी अफगाणिस्तानला मानवतावादी मदत थांबवली.

## आज मिटमिटा येथे गुंठेवारी शिबिराचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत महोदय यांनी दिनांक ३०/८/२०२५रोजी पडेगाव मिटमिटा येथे स्थळ पाहणी होती.यावेळी त्यांनी सदर वसाहतीमध्ये गुंठेवारी कॅम्प घेण्याचे तोंडी आदेशीत केले होते. व तसेच याबाबत मा. उपसंचालक नगर रचना यांच्यासोबत सुद्धा चर्चा करण्यात आली होती .

या अनुषंगाने दिनांक ३/९/२०२५ व ४/९/२०२५ रोजी सकाळी ९-४५ ते सायंकाळी ६-१५ पर्यंत,सरस्वती टावर्स गट नंबर १३८ मौजे मिटमिटा, माई वडापावच्या बाजूस, पडेगाव ते मिटमिटा मेन रोडला लागून येथे ठेवण्यात आलेला आहे.तरी नागरिकांनी या गुंठेवारी व मालमत्ता कर शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मनपा प्रशासन यांचे तर्फे करण्यात आले आहे.

## लोकशाही दिनी २० अर्ज प्राप्त

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- जिल्हास्तरीय लोकशाही दिनी जिल्हाधिकारी कार्यालयात आज पार पडला. यावेळी २० तक्रारी अर्ज प्राप्त झाले. जिल्हा परिषद - २ अर्ज, महसुल विभाग - २, पुरवठा विभाग - १, इतर साधे निवेदन १५ असे एकूण २० अर्ज प्राप्त झाले, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागातून देण्यात आली.

## कार्यालय नगर परिषद वैजापूर,

जि. छत्रपती संभाजीनगर

दुरध्वनी क्र. ०२४३६-२९५०३६ / Email ID: npvaijapur@gmail.com

जा.क्र./नपवै/कावि/२०२५/ दिनांक : ०२/०९/२०२५

### जाहीर प्रकटन

याद्वारे वैजापूर शहरातील सर्व नोंदणीकृत सार्वजनिक गणेश मंडळास आवाहन करण्यात येते कि, वैजापूर नगर परिषदेने प्रति वर्षाप्रमाणे पर्यावरण पूरक गणेश उत्सवासाठी बक्षीस जाहीर केलेले असून नगर परिषदेने गणेश मंडळांच्या मूल्यांकनासाठी समिती स्थापन केली असून सदर समिति दिनांक ०३, ०४, ०५, सप्टेंबर २०२५ या तारखेस मूल्यांकनासाठी येणार आहे. तरी सर्व गणेश मंडळांनी त्यांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येते.

स्वाक्षरित/ -
मुख्याधिकारी
नगर परिषद वैजापूर

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइटः** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा भौतिक ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि २३.०९.२०२५ दुपारी १२.३० ते ०१.३०** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवणाऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|
| **१. श्री. अब्दुल रहमान जमीर अहमद खान (कर्जदार)<br>२. श्री. झमीर अहमद खान (सह-कर्जदार २)<br>३. श्रीमती शैन बी जमीर अहमद खान (सह-कर्जदार 3)<br>४. श्री. मोहम्मद रुमन खान (सह-कर्जदार ४)<br>निवासस्थान : फ्लॅट क्रमांक ०४, पहिला मजला, फारुकी निवासस्थान, शहर सर्वेक्षण क्रमांक: ६६७९, लोटा कारंजा औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१<br>तसेच-एफ-२, अपना कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भडकल गेट, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१<br>तसेच मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्र:06, हिबा अपार्टमेंट, सीटीएस क्र २१५८,२१५८/ २, स्टिल्ट तिसऱ्या मजल्यावर, प्रगती कॉलनी घाटी, औरंगाबाद,महाराष्ट्र-४३१००१<br>तसेच निवासस्थानाचा पत्ता: एफ-२ मदरसा, कोहना महल शाह बीबी जेल रोड, रामपूर शहर, रामपूर, उत्तर प्रदेश-२४४९०१<br>निवासस्थान पत्ता: एफ-२, जुबली कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भडकल गेट, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१<br>कर्ज खाते क्रमांक SHLHAURD0000536**<br>ताबा दिनांक व ताबा प्रकार **२४ मे २०२५ भौतिक ताबा**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी सूचना तारीख: ०९/११/२०२४ दिनांक ०६-११-२०२४ रोजी कर्ज खाते क्र. SHLHAURD0000536 अंतर्गत रु. २६,५०,३२९/- (रुपये सव्वीस लाख पन्नास हजार तीनशे एकोणतीस फक्त) सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत करारानुसार व्याजदराने पुढील व्याजासह | रु.१७,५०,०००/- (रुपये सतरा लाख पन्नास हजार फक्त)<br>**बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. १,७५,०००/- (रुपये एक लाख पंचाहत्तर हजार फक्त)<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख: २२ सप्टेंबर २०२५ वेळ सकाळी १०.०० ते सायं ०५.०० वा.** | **२३ सप्टेंबर २०२५ वेळ. सकाळी दुपारी १२.३० ते ०१.३०** | **अश्फाक पत्का- ९८१९४ १५४७७.<br>सुनील मानेकर ८९९९३४४८९७<br>अक्षय गुप्ता ८९८३५५२७३७<br>अजय झांझोत ९८२३३९०९१०<br>निरीक्षण तारीख: १२.०९.२०२५ वेळ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत.** |

**संपत्तीचे विवरण**

फ्लॅट क्रमांक ०६, स्टिल्ट तिसऱ्या मजल्यावर, हिबा अपार्टमेंट्स, सी.टी.एस. क्रमांक २१५८ आणि २१५८/२, ४४.५१ चौ. मीटर, प्रगती कॉलनी, घाटी येथे, मकाई गेटजवळ, तालुका आणि जिल्हा औरंगाबाद.
पूर्व: फ्लॅट क्रमांक ०५ आणि जिना, पश्चिम: सीटीएस क्रमांक २१६० आणि खुली जाग दक्षिण: सीटीएस क्रमांक २१६९ आणि खुली जागाउत्तर: रस्ता

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी 0000२३० येथे जमा करावी:**

ठिकाण -औरंगाबाद
दिनांक - ०३-०९-२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )